देवळांच्या गावा...

# बाणगंगा-प्राचीन तीर्थक्षेत्र

डॉ.तुषार यशवंत सावडावकर

मुंबईसारख्या आधुनिक शहरामध्ये एक प्राचीन तीर्थक्षेत्र आहे, हे आज अनेकांना माहितही नसेल. पण हे त्रिकालबाधित सत्य आहे. मुंबईमध्ये वाळकेश्वर या ठिकाणी 'बाणगंगा' नावाचं अतिशय प्राचीन रामायणकालीन तीर्थक्षेत्र वसलेलं आहे. अत्यंत खेदाची गोष्ट अशी की या ठिकाणी आपल्या स्थानिक लोकांपेक्षा परदेशी पर्यटकांचा वावर जास्त आहे. आपल्यापेक्षा त्यांना या तीर्थक्षेत्राची भरपूर माहिती असून त्यांना या तीर्थक्षेत्राबद्दल अत्यंत आदर आहे.

बाणगंगा म्हणजे एक मोठा गोड्या पाण्याचा तलाव असून या तलावाच्या ईशान्य दिशेला गोड पाण्याच्या झऱ्याचा उगम आहे. हे पाणी कुठून येतं हादेखील संशोधनाचा विषय आहे. 'बाणगंगा' हा शब्द बाणापासून तयार झालेला तसंच गंगा नदीचं पवित्र पाणी वापरून या पवित्र नदीला बाणगंगा हे नाव पडलं आहे. श्री विष्णूचा सहावा अवतार श्रीपरशुराम यांच्या बोलावण्याने किंवा हाकेने सह्याद्री पर्वताच्या शिखरावर त्यांनी बाण सोडला आणि त्यामधून गंगेचा (भागिरथीचा) उगम झाला. या उगमानंतर नदीला 'बाणगंगा' हे नाव पडलं. ही नदी अद्यापही अस्तित्वात आहे.

दुसऱ्या आख्यायिकेनुसार श्री विष्णूचा सातवा अवतार श्री प्रभू रामचंद्र, रावणाने जेव्हा सीतामातेला हरण केलं होतं तेव्हा लक्ष्मणाला घेऊन इथे आले होते. त्यांना खूप तहान लागली होती. पिण्याकरता कुठेच पाणी न मिळाल्यामुळे लक्ष्मणाने जमिनीवर बाण मारला आणि हा बाण धरतीला छेदून पाताळात गेला. तिथून गंगा नदीच्या पाण्याचं कारंजं तयार झालं. त्या पाण्यापासून रामचंद्राने आपली तहान भागवली. प्रभू रामचंद्रांची तहान भागवल्यानंतर ते पाण्याचं कारंजं तसंच राहिलं आणि आजही नदीच्या पात्र स्वरूपात अस्तित्वात आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही नदी समुद्रकिनारी असूनही तिचं पाणी खारट नाही. तर ते अजूनही गोड आहे. गंगा नदीचा उगम पाताळातून झाला असल्याने 'बाणगंगा' नदीला 'पाताळगंगा' असंही संबोधलं जातं.

बाणगंगा नदीला पवित्र तीर्थ असं म्हटलं जातं. पुराणामध्ये आणि स्कंद पौराणिक कथेमध्ये असं बऱ्याचदा सांगितलं आहे की, बाणगंगेमध्ये स्नान केल्यास मानव पवित्र होतो आणि त्याच्या आत्म्याला नवचैतन्य प्राप्त होतं.

एका पुरातन दाखल्यानुसार असं सांगण्यात येतं की, या ठिकाणी एक मनुष्य राहत होता. त्याने आपलं संपूर्ण आयुष्य दुष्ट कामं करण्यात घालवलं. हा दुष्ट माणूस एकदा जंगलातून जात असताना एका वाघाने त्याला मारून टाकलं. त्याच्या शरीराचा काही भाग एक कपूर पक्षी हवेतून घेऊन उडून जात असताना त्याच्यामागे घार लागली. तेव्हा बचाव करताना कपूर पक्षाच्या तोंडी असलेल्या दुष्ट माणसाच्या शरीराचा तुकडा नकळतपणे बाणगंगेत पडला. ते श्री शंकराने वरून पाहिलं. त्यांनी आपल्या दूतांकरवी एक विमान पाठवून बाणगंगेच्या पाण्यात पडलेल्या त्या दुष्ट माणसाचा आत्मा कैलास पर्वतावर आणण्यास सांगितला. असं झालं नसतं तर यमाचे दूत त्याला नरकात घेऊन गेले असते असं पुराण सांगतं. या आख्यायिकेवरून या तीर्थक्षेत्रात स्नान केल्यास पुण्यप्राप्ती होते हे स्पष्ट होतं. श्री शंकराचं असं म्हणणं आहे की या बाणगंगेच्या पाण्याने त्या दुष्ट माणसांची सर्व पापं नष्ट होऊन तो पवित्र झाला. म्हणजेच, त्या पवित्र आत्म्याला विमानाने कैलास पर्वतावर नेण्यात आलं.

पिंडदानासारखी कार्यदेखील या पवित्र तीर्थावर केली जातात.



## प्रदक्षिणा

बाणगंगेला प्रदक्षिणा घालण्याचीही परंपरा आहे. देवपूजेतला प्रदक्षिणा हा पंधरावा उपचार. प्रदक्षिणेमध्ये 'प्र' + 'दक्षिणा' असे दोन शब्द असून 'प्र' म्हणजे प्रकर्षाने आणि 'दक्षिण' म्हणजे डावी बाजू. प्रदक्षिणा म्हणजे डावीकडून उजवीकडे गोल फिरून आदरयुक्त नमन करण्याचा एक प्रकार. मूर्ती आपल्या उजव्या बाजूला राहिल अशा प्रकारे तिच्याभोवती घातलेली फेरी म्हणजे प्रदक्षिणा होय.

प्रदक्षिणा घालताना सतत नामस्मरण केल्यामुळे देहशुद्धी घडते. प्रदक्षिणेच्या वेळी शरीरात जैविक विद्युत निर्माण होऊन चित्तशुद्धीला मदत होते जेणेकरून मानसिक आणि शारीरिक विकार दूर होऊन मनोबल वाढतं. मनोविकृत रुग्णांनाही प्रदक्षिणेचा फायदा होतो. त्यांचं मन सुदृढ बनतं. प्रत्येक देवदेवतांच्या मूर्तीभोवती एक प्रकारचं तेजोवलय वा लहरी असतात. त्या लहरीच्या आपण कक्षेत गेलो असता आपल्या शरीरातले सूक्ष्म कोश शुद्ध आणि तेजस्वी बनतात. विशिष्ट देवतेच्या तेजोवलयाशी जवळीक साधल्यास त्या देवतांच्या सूक्ष्म तेजाची प्राप्ती होते. दिव्य तेजोवलयांची चक्रगती वा प्रभाव लहरींचं भ्रमण हे दक्षिणावर्ती असतं. म्हणून तेजोलहरींना सुसंगत अशी दक्षिणावर्ती गती आपण घेतली तर त्या दिव्य परमाणूंची प्राप्ती आपणास होते. उलटी प्रदक्षिणा घातली तर या तेजोमय लहरींशी संघर्ष होऊन शरीरातल्या जैविक शक्ती बिघडण्याची शक्यता असते. स्त्रिया तुळशीला किंवा पिंपळाला प्रदक्षिणा घालतात त्यामागे हाच हेतू असतो. आपल्या शरीराला पोषक अशा सूक्ष्म लहरी या वृक्षांमधून अदृश्यपणे वाहत असतात. त्याचा फायदा आपणास प्राप्त होतो. पृथ्वी स्वतःभोवती भ्रमण करते आणि सूर्याभोवतीही फिरते. त्या गुरुत्वाकर्षण शक्तीचाही आपणास फायदा मिळावा हा हेतू प्रदक्षिणा घालण्यामागे आहे.

mtartedit@gmail.com